# ४. १८५७ चा स्वातंत्र्यलढा

## १. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

(उमाजी नाईक, स्वातंत्र्यसमर, लॉर्ड डलहौसी, भारतमंत्री, तात्या टोपे)

(१) स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १८५७ च्या लढ्याला **स्वातंत्र्यसमर** हे नाव दिले.

(२) रामोशी बांधवांना संघटित करून यांनी **उमाजी नाईक** इंग्रजांविरुद्ध बंड केले.

(३) १८५७ च्या लढ्यानंतर भारताविषयी कारभार करण्यासाठी **भारतमंत्री** हे पद इंग्लंडच्या शासनात निर्माण करण्यात आले.

(४) भारतातील संस्थाने **लॉर्ड डलहौसी** या गव्हर्नर जनरलने खालसा केली.

## २. पुढीलपैकी विधाने सकारण स्पष्ट करा.

**(१) इंग्रजांविरुद्ध पाइकांनी सशस्त्र उठाव केला.**
**उत्तर:** (१) इंग्रजांनी १८०३ मध्ये ओडिशा जिंकून घेतला.
(२) येथे असणाऱ्या पाइकांच्या वंशपरंपरागत जमिनी इंग्रजांनी काढून घेतल्या.
(३) मिठाच्या किमतीत वाढ केल्यामुळे सामान्य जनतेप्रमाणे पाइकांचे जीवनही असह्य झाले.
त्यामुळे संतापलेल्या पाइकांनी १८५७ मध्ये इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव केला.

**(२) हिंदू व मुस्लीम सैनिकांमध्ये असंतोष निर्माण झाला.**
**उत्तर:** (१) ब्रिटिशांनी १८५६ साली हिंदी सैनिकांना लांब पल्ल्याच्या एन्फिल्ड बंदुका दिल्या.
(२) या बंदुकांतील काडतुसांवरील आवरण दाताने तोडावे लागे.
(३) या आवरणाला गाईची व डुकराची चरबी लावलेली असल्याची बातमी हिंदी सैनिकांमध्ये पसरली.
(४) गाय हिंदूंना पवित्र; तर डुक्कर मुस्लिमांना निषिद्ध असल्याने हिंदू व मुस्लिम सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या; त्यामुळे या सैनिकांत असंतोष निर्माण झाला.

**(३) भारतीय सैनिकांचा इंग्रज सैन्यापुढे निभाव लागला नाही.**
**उत्तर:** भारतीय सैनिकांचा इंग्रज सैन्यापुढे निभाव लागला नाही; कारण -
(१) भारतीय सैनिकांकडे पुरेशी आणि अद्ययावत शस्त्रास्त्रे नव्हती.
(२) इंग्रजांकडे असलेली मोठी आर्थिक ताकद आणि अनुभवी सेनानी भारतीय सैनिकांकडे नव्हते.
(३) भारतीय सैनिकांकडे शौर्य असले; तरी इंग्रजांप्रमाणे योग्य वेळी योग्य डावपेच आखण्यात ते कमी पडले.
(४) दळणवळणाच्या साधनांवर इंग्रजांचा ताबा असल्याने आपल्या सैनिकांच्या जलद हालचाली करण्यात इंग्रज यशस्वी ठरले.

## ३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

**(१) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यामागे कोणती सामाजिक कारणे होती?**
**उत्तर:** १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यामागील सामाजिक कारणे -
(१) आपल्या परंपरा, चालीरीती, रूढी यात इंग्रज शासक हस्तक्षेप करीत आहेत, अशी भारतीय समाजाची धारणा झाली.
(२) सामाजिकदृष्ट्या विघातक अशी सतीची चाल, विधवाविवाहास बंदी अशा प्रथांना इंग्रजांनी कायद्याने बंदी घातली.
(३) असे कायदे करून परकीय सरकार आपली जीवनपद्धती मोडू पाहत आहे असा लोकांचा समज दृढ होऊ लागला.

**(२) १८५७ च्या लढ्याच्या अपयशाची कारणे लिहा.**
**उत्तर:** १८५७ चा लढा पुढील कारणांमुळे अपयशी झाला -
(१) १८५७ च्या उठावाची व्याप्ती उत्तर भारतापुरती मर्यादित राहिली. संपूर्ण भारतभर आणि एकाच वेळी उठाव झाला नाही.
(२) इंग्रजांप्रमाणे उठावाला एकसंध असे नेतृत्व मिळाले नाही.
(३) अनेक संस्थानिक इंग्रजांशी एकनिष्ठ राहिल्याने उठावकऱ्यांची ताकद कमी पडली.
(४) शौर्य असूनही युद्धातील डावपेच आखण्यात उठावकरी कमी पडले.
(५) उठावकऱ्यांकडे पुरेशी शस्त्रास्त्रे नव्हती.
(६) इंग्रजांकडे असलेली आर्थिक ताकद, अद्ययावत शस्त्रे आणि अनुभवी सेनानी यांचा उठावकऱ्यांकडे अभाव होता.
(७) दळणवळणाचा ताबा इंग्रजांकडे असल्याने सैन्याच्या शिस्तबद्ध व जलद हालचाली त्यांना करता आल्या. त्यांच्यापुढे भारतीय सैन्याचा निभाव लागला नाही.
(८) इंग्रजांची आरमारी ताकद भारतीय संस्थानिकांपेक्षा मोठी होती.

**(३) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे परिणाम लिहा.**
**उत्तर:** १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे झालेले परिणाम पुढीलप्रमाणे
(१) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराविरुद्ध जनतेत असलेल्या असंतोषामुळे हा लढा लढला गेला, याची जाणीव इंग्लंडच्या राणीला झाली.
(२) भारतातील इंग्रजी सत्ता कंपनीच्या हाती सुरक्षित नाही याची खात्री होऊन १८५८ च्या कायदयाने ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात आणून ब्रिटिश पार्लमेंटने भारताचा कारभार आपल्या हाती घेतला.
(३) राणी व्हिक्टोरिया हिला एक जाहीरनामा काढून भारतीयांना अनेक आश्वासने दयावी लागली.
(४) इंग्रजांनी भारताच्या लष्कराची पुनर्रचना करून अंतर्गत धोरणात धोरणात्मक बदल केले.

**(४) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर इंग्रजांनी कोणते धोरणात्मक बदल केले?**
**उत्तर:** १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर इंग्रजांनी पुढील धोरणात्मक बदल केले -
(१) भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करायचा नाही.
(२) भारतीय समाज सामाजिकदृष्ट्या एकसंध होणार नाही, याची काळजी घेणे.
(३) भारतीय समाजात जात, धर्म, वंश, प्रदेश या कारणांवरून सतत संघर्ष होतील, असे प्रयत्न करणे.
(४) भारतीय समाज घटकांत एकमेकांविषयी मने कलुषित होण्यासाठी 'फोडा व राज्य करा' हे धोरणसूत्र ठरवले गेले.